# कलेची तत्वे व कलेचे मुलघटक

Prof. Sonali Bansod
Head
Department of Home Economics
**Lok Mahavidyalaya Wardha**

**प्रास्ताविक :-**


- केलेली सजावट कलेच्या दृष्टीकोणातून योग्य झाली आहे किंवा नाही हे ठरविणारे घटक म्हणजे कलेची तत्वे आहेत.


**परिभाषा :-**

- फ्राईड यांच्या मते, '' कला म्हणजे दमन झालेल्या वासनेची पुर्ती होय''.

## कलेची तत्वे :-

- १) प्रमाण (proportion)
- ॲना हॉग रट यांच्या मते, ‘‘एका वस्तुच्या विभिन्न भागांचा किंवा कुठल्याही एका समुहातील विभिन्न वस्तुंच्यामध्ये समाधानकारक संबंधांना प्रमाण असे म्हणतात.
- **कलेच्या बाजू :-**
- **प्रमाण आणि रेषा :-**
- वेगवेगळया रेषांचा उपयोग करून वेगवेगळे आभास निर्माण करता येतात उभ्या रेषेमुळे व्यक्तीची नजर उभी व आडव्या रेषेमुळे आडवी फिरते.






**प्रमाण आणि अवकाश :-**


- अवकाशात प्रमाणबध्दता असल्यामुळे एकात्मता व विविधता निर्माण करून आकर्षक सजावट करता येते.
- **प्रमाण आणि मान किंवा माप :-**
- वस्तुचे माप लक्षात न घेता सजावट केली तर सौदर्यनिर्मिती होत नाही.

## २) संगती (harmony)

- हॅरीएट व व्हेटा गोल्डन स्टेनच्या मतेए “वस्तु व विचारांची योग्य निवड व मांडणी करून त्यामध्ये एकतेची भावना निर्माण करणारे कलेचे तत्व म्हणजे संगती होय”.
- **रेषा व संगती :-**
- ज्या रेखा समांतर असतात अथवा पुन्हा पुन्हा एकाच दिशेने काढलेल्या असतात. तेव्हा त्यांना पुनरावृत्ती रेषा म्हणतात.



- ज्या वेळेस रेषा आडव्या व उभ्या काटकोणात एकत्र एकूण विरोधी आकारात तयार होतात. तेव्हा त्यांना विरोधी रेषा असे म्हणतात.




**संगती व आकार :-**

- कुठल्याही सजावटीत संगती साधावयाची असेल तर वस्तुंचे आकार ठरविणे महत्वाचे असते.
- **संगती व पोत :-**
- गृहसजावट करतांना पोतामध्ये संगती साधने महत्वपुर्ण असते.
- **संगती व कल्पना :-**
- कल्पनेमध्ये संगती असावी.
- **संगती व रंग :-**
- रंगाचा उपयोग करीत असतांना विविध रंगाचा उपयोग करून सौदर्य व आकर्षकता, विविधता निर्माण करता येते.


## ३) संतूलन / समतोल (Balance)

- जॅना टॉग रट च्या मते, ‘‘केंद्रबिंदूच्या प्रत्येक बाजूला समान आकर्षणाचा परिणाम म्हणजे स्थिरता किंवा संतूलन होय’’.
- संतूलनाचे तीन प्रकार :–
- **समान संतूलन :–**
- जेव्हा केंद्रबींदूपासून दोन्ही बाजूला सारख्या आकाराच्या वस्तूंची मांडणी करून संतूलन साधण्यात येते, त्याला समान संतूलन असे म्हणतात.




## असमान संतूलन :–

- ज्यावेळेस संतूलन साधण्याकरीता विभिन्न आकार केंद्रबिंदूपासून वेगळया अंतरावर ठेवल्या जातात. तेव्हा त्याला असमान संतूलन म्हणतात.



**गोलाकार संतूलन :-**


- हा समसंतूलनाचा प्रकार आहे. यामध्ये केंद्रबिंदूपासून गोल आकाराच्या वस्तूंची मांडणी केलेली असते.




## ३) लय (Rhythm)

- लय म्हणजे हालचाल होय. लय म्हणजे संबंधित असलेला मार्ग, ज्याच्या मदतीने रेषा व रंग यावरून नजर सहजपणे फिरू शकते.
- लय विविध प्रकाराने साधता येते :-


आकारमान पुनरावृत्ती करून :-



आकारमानात वृध्दी करून :-



निरंतर रे”ाा गती :-



**लयीचे दोन प्रकार आहे :-**

- नियमानुसार लय :-
- स्वच्छंद लय :-

- **लयीचे दोन प्रकार आहे :-**
- नियमानुसार लय :-
- स्वच्छंद लय :-

**४) प्राधान्य**

- ॲना हॉग रटच्या मते, ‘‘प्राधान्य हे कलेचे असे तत्व आहे की, ज्यामुळे कुठलाही योजनेमध्ये प्रभावकारी विचार किंवा रंगाकडे लक्ष केंद्रीत केल्या जाते’’.
- (Emphasis is the principal that directs us to have a center of interest in any arrangement and a dominating idea, form of color in ay scheme)

- **अ) प्राधान्य कशाला दयावे :-**
- प्राधान्य दयायचे आहे त्या वस्तुंची निवड सर्वप्रथम करावी. नंतर इतर वस्तुंचा विचार करावा.
- **ब) प्राधान्य कसे दयावे :-**
- उदा. :- भिंतीवरील सर्व चित्रांची स्थिती कशी आहे व एकखादे चित्र आडवे लावल्यास त्या चित्राकडे लक्ष आकर्षित होते.
- **क) प्राधान्य किती दयावे :-**
- उदा. :- खोलीत सजावट खुप जास्त प्रमाणात केल्यास आकर्षक होत नाही. खोलीतील गौण भाग व प्राधान्य याचे प्रमाण ३:२ असे असावे.
- **ड) प्राधान्य कोठे दयावे :-**
- वस्तुच्या आकर्षक केंद्राचा विचार करून ती वस्तु सर्व बाजूने सारखी दिसेल अशारितीने ठेवल्यास प्राधान्य देता येते.